**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:04.01.2025** **वार:शनिवार**

---

1. लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात Know Your Army मेळाव्याचं आयोजन
2. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या द्विशताब्दीपूर्वी त्यांच्या स्मारकाचं काम पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
3. शेतीच्या नुकसानाचं उपग्रहाद्वारे सर्वेक्षण करण्याची केंद्रीय कृषीमंत्र्यांची घोषणा
4. राज्यात यंदाच्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये वार्षिक सरासरीच्या सुमारे 95 टक्के परदेशी गुंतवणूक आणि
5. बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी मालिकेतल्या निर्णायक सामन्यात भारताच्या पहिल्या डावात सर्वबाद 185 धावा; ऑस्ट्रेलियाची पहिल्या डावात अडखळत सुरुवात

**Know Your Army**

भारतीय सेना ही जगातील सर्वोत्तम सेनांपैकी एक सेना आहे. कोणत्याही प्रकारचा हल्ला सेना परतवून लावू शकते, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात व्यक्त केला. 15 जानेवारी रोजी पुण्यात साजऱ्या होणाऱ्या लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर Know Your Army मेळाव्याचं उद्घाटन करताना ते बोलत होते. लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, खासदार मेधा कुलकर्णी आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. या मेळाव्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**भारतीय लष्कर दिनानिमित्त होणारा भव्य संचलन सोहळा यंदा 15 जानेवारी रोजी पुण्यात होणार आहे. लष्कर दिनानिमित्त होणारं संचलन 2023 मध्ये बंगलोर मध्ये तर 2024 च सोहळा लखनौ मध्ये पार पडला. 2025 चा संचलन सोहळा पुण्यातील बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर होणार आहे. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या know your army या प्रदर्शनात भारतीय लष्कराची सक्षमता दर्शवण्यात आली आहे. भारतीय लष्करात वापरली जाणारी भारतीय बनावटीची अत्याधुनिक उपकरण, पिनका रॉकेट यंत्रणा, धनुष आणि बोफोर्स तोफा, रशियन बनावटीच टी 90 रणगाडा, चिलखती वाहनं, आकाश क्षेपणास्त्र, विविध प्रकारचे द्रोण, आदी शस्त्र सामग्री प्रदर्शनात ठेवण्यात आली आहे. उद्घाटन कार्यक्रमात कुकरी नृत्य, लेझिम नृत्य, कलारी पयातू, अश्वरोहन प्रात्यक्षिक, शीख युद्धकला याच प्रात्यक्षिक झालं, स्वॉर्न द्रोण ची प्रात्यक्षिक दाखवण्यात आली हे द्रोण 24 तास आकाशात उडू शकतात. 3 ते 5 जानेवारी दरम्यान हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, श्रद्धा वार्डे, पुणे.**

**मुख्यमंत्री-आळंदी**

भारतीय संस्कृती जगातील सर्वात प्राचीन संस्कृती असून संतांनी जनतेमध्ये निरपेक्षपणे जनजागृती केल्यामुळं भारतीय संस्कृती जिवीत राहीली आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल आळंदी इथं केलं. श्रीक्षेत्र आळंदी इथं वेदश्री तपोवन परिसरात आयोजित संत कृतज्ञता संवाद कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी संत, धर्माचार्य आणि कीर्तनकारांचे आशीर्वाद घेतले, त्यावेळी ते बोलत होते. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मंत्री पंकजा मुंडे, आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते. इंद्रायणी, गोदावरी, चंद्रभागा यांना स्वच्छ वाहणाऱ्या नद्या बनवण्यासाठी येत्या काळात संपूर्ण क्षमतेनं प्रयत्न केले जातील. इंद्रायणीच्या पुनरुज्जीवनाचा संकल्प आम्ही पूर्ण करु असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. राज्याच्या विविध भागातून आलेले संत, कीर्तनकार, नागरिक मोठया संख्येनं याप्रसंगी उपस्थित होते.

**<u>सावित्रीबाई फुले जयंती</u>**

महिलांसाठी शिक्षणाची कवाडं खुली करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची 194 वी जयंती काल राज्यात विविध उपक्रमांद्वारे साजरी करण्यात आली. सातारा जिल्ह्यातल्या नायगांव या सावित्रीबाईंच्या जन्मगावी आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातले अन्य मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानाला साजेशा भव्य स्मारकासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. थोर माणसांचं कार्य कधीही संपत नाही, त्यांचं स्मारक उभं करत असताना पुतळ्यासोबतच विचारांचंही स्मारक झालं पाहिजे, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची आणखी पाच वर्षांनी द्विशताब्दी साजरी होणार आहे. त्यापूर्वी त्यांच्या स्मारकाचं काम पूर्ण करावं आणि त्यासाठी प्रशासनानं 10 एकर जमिनीचं तत्काळ अधिग्रहण करावं, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.....

राज्यातल्या सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये तसंच मंत्रालयात आणि मंत्र्यांच्या दालनात सावित्रीबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं.

विधानसभेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी पुण्यातल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारातल्या सावित्रीबाईंच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. महिलांचे अधिकार म्हणजेच मानवी अधिकार आणि याची स्थापना राज्यात आणि देशात सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी केली असं त्या यावेळी म्हणाल्या. सावित्रीबाईंच्या जयंतिनिमित्त राज्यात अनेक ठिकाणी महिला मेळावा, व्याख्यानं इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**<u>केंद्रिय कृषीमंत्री-नाशिक</u>**

शेतकऱ्यांचं होणारं नुकसान आणि पीक विम्याची रक्कम यातली तफावत दूर करण्यासाठी आता उपग्रहाचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे नुकसानीचं अचूक मोजमाप होऊन त्यांना योग्य भरपाई मिळू शकेल असं केंद्रिय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. ते काल नाशिक इथं शेतकरी संवाद मेळाव्यात बोलत होते. शेतकरी अन्य राज्यात शेतमाल विकणार असेल तर त्यासाठी येणारा वाहतूकीचा खर्च केंद्र आणि राज्य शासनानं प्रत्येकी पन्नास टक्के करावा अशी सूचना त्यांनी यावेळी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत उत्पादनांची माहिती घेतली.

**<u>गुंतवणूक</u>**

2024-25 या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यातच राज्यात 1 लाख 13 हजार 236 कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक झाली आहे. ही गुंतवणूक गेल्या चार वर्षातल्या वार्षिक सरासरीच्या 94पूर्णांक 71 शतांश टक्के इतकी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे ही माहिती दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी या यशाबद्दल राज्यातल्या जनतेचं अभिनंदन केलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच मंत्रीमंडळातल्या सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्यानं ही घोडदौड अशीच सुरू राहील अशी ग्वाही या संदेशातून त्यांनी दिली आहे.

**<u>संमेलन-सांगली</u>**

सांगली जिल्ह्यात मिरज इथल्या कन्या महाविद्यालयात "हिंदी संत साहित्य की प्रासंगिकता एव प्रदेय" या विषयावर आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचं काल उद्घाटन करण्यात आलं. मॉरिशसच्या कवयित्री सविता तिवारी यांनी यांच्या हस्ते याचं उद्घाटन झालं. भारतीय संस्कृतीतील नैतिक मूल्य आजही मॉरिशसच्या मातीमध्ये रुजलेली आम्हाला पाहायला मिळतात. असं मत सविता तिवारी यांनी यावेळी व्यक्त केलं. भारतानं आपल्या समृद्ध संत परंपरेचं जतन करावं असं आवाहन यावेळी त्यांनी केलं. कन्या महाविद्यालय मिरज, हिंदुस्थानी प्रचार सभा मुंबई आणि शिवाजी विद्यापीठ परिषद यांनी संयुक्तपणे हे आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केलं आहे.

**<u>जलसंपदा मंत्री-सोलापूर</u>**

सोलापूर जिल्ह्यातल्या उजनी धरणात यंदा गेल्या वर्षीपेक्षा जास्त म्हणजे सुमारे 97 टक्के पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि नागरिकांना पिण्यासाठी संपूर्ण उन्हाळ्यात पाणी उपलब्ध असेल यासाठी सूक्ष्म नियोजन करावं अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल दिल्या. उजनी प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. दरम्यान, मराठवाड्याच्या हक्काच्या कृष्णा खोऱ्यातील पाण्याबाबत पुढच्या आठवड्यात बैठक घेणार असल्याची माहिती विखे पाटील यांनी तुळजापूर इथं दिली.

**<u>पोलिस प्रदर्शन-लातूर</u>**

महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त लातूरच्या क्रीडा संकुलात पोलिस दलानं भव्य प्रदर्शन आयोजित केलं आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते काल या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. या प्रदर्शनात पोलिस दलातल्या विविध विभागांची तसंच पोलिसांच्या शस्त्रांची माहिती देणारी दालनं आहेत. आज या प्रदर्शनाचा शेवटचा दिवस आहे. काल या प्रदर्शनाला ८ हजारपेक्षा जास्त विद्यार्थी आणि नागरिकांनी भेट दिली.

**<u>क्रिकेट</u>**

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अखेरच्या निर्णायक सामन्यात ऑस्ट्रेलियाची पहिल्या डावात अडखळत सुरुवात झाली. आतापर्यंत त्यांच्या 4 गडी बाद 79 धावा झाल्या आहेत. तत्पूर्वी काल सामन्याच्या पहिल्या दिवशी भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताचा पहिला डाव 185 धावांवर संपुष्टात आला. भारतातर्फे रिषभ पंतनं सर्वाधिक 40 धावा केल्या.

**<u>हवामान</u>**

विदर्भात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. काल राज्यात सर्वात कमी किमान तापमान 8 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील आणि किमान तापमानात काहीशी घट होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.